डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा. क्र: सीव्हीसी/कार्या .१४/जा.आवाहन/२०२६-२७/ ०२७६ दिनांक :- २०.११.२०२६

जाहिर आवाहन

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, कृषी शिक्षण, वैद्यकीय/आयुष शिक्षण आणि कला शिक्षण विभागाच्या विविध पदवी व पदव्युत्तर पदवी या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राखीव प्रवर्गामधून प्रवेशासाठी केंद्रभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आलेल्या आहेत. ज्या अर्जदारांचे राखीव प्रवर्गामधून प्रवेश निश्चित झालेले आहेत त्यापैकी अद्याप जात वैधता प्रमाणपत्र निर्णय प्रक्रियेत आहेत अशा व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या पात्र विद्यार्थ्यांना त्रुटी पूर्तता करण्याबाबत Sms/ Email व पत्राव्दारे संबंधित समित्यांमार्फत कळविण्यात येऊनही अनेक अर्जदार/विद्यार्थी यांनी संबंधीत समित्यांशी संपर्क साधलेला दिसून येत नाही. त्रुटी पूर्तता करण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारांची आहे.

जात वैधता प्रमाणपत्राअभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेपासून वंचित राहू नये याकरिता ज्या अर्जदार/विद्यार्थ्यांनी अद्यापही वैधता प्रमाणपत्राबाबत त्रुटींची पूर्तता केलेली नाही, त्या अर्जदारांनी आपल्या अर्जदार लॉगीनवरुन ऑनलाईन त्रुटी पूर्तता करावी. याकरिता अधिक माहितीसाठी **https://www.cvc.barti.in/ या नवीन पोर्टलवर अर्जदार यांच्या शंका निरसन व मदतीकरिता** BARTI Helpdesk दुरध्वनी क्र:- ०२०-२६३३३३३९ । WhatsApp :- ९४०४९९९४५२ (WhatsApp Messages Only) । ई-मेल :- helpdesk@barti.in उपलब्ध करुन देण्यात आले असून या नवीन पोर्टलचा व सेवांचा वापर करून सुधारित व नागरिक-केंद्रित सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मा. डॉ. हर्षदीप कांबळे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि मा.श्रीमती दीपा मुधोळ-मुंडे, महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा मुख्य समन्वयक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या (सर्व) महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात येत आहे.